# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-४३१-२०२४** **दिनांक-१३/११/२०२४**

## प्रेस नोट

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्फे

# जाहीर आवाहन

## सोशल मिडीयाचा निवडणुकीच्या काळात योग्य वापर करावा. (Digital/Social Media- मार्गदर्शक सुचना)

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सर्व नागरीकांना याद्धारे कळविण्यात येते की, लोकसभा पोटनिवडणुका २०२४ व विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ अनुषंगाने दि.१५/१०/२०२४ पासुन ते दि. २५/११/२०२४ रोजी पावेतो पर्यंत आदर्श आचारसंहिता अंमलात असुन मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील जिल्हयासह संपुर्ण महाराष्ट्र सार्वत्रिक निवडणुक २०२४ चे मतदान दि. २०/११/२०२४ रोजी व निकाल दि. २३/११/२०२४ रोजी जाहिर होणार आहे. तरी कोणीही नागरीक सोशल मिडीयाद्धारे फेसबुक, इंस्ट्राग्राम, यु टुब चैनल, ट्विटर एक्स खाते, व्हॉटसअप ग्रुप व इतर तत्सम एप्लीकेशनच्या माध्यमाद्धारे कोणत्याही व्यक्तीच्या, वंशाच्या, समाजाच्या, जातीच्या, धर्माच्या व वर्णाच्या भावना दुखावतील अशा स्वरुपाच्या पोस्ट, कॉमेंटस्, स्टोरी स्टेटस, डिजीटल बॅनर असे प्रकार वरील माध्यामाद्धारे प्रसारीत करु नयेत.

तसेच कोणाचेही विरोधात घोषणाबाजी करु नये, डिजे वाजवणार नाहीत, फटाके फोडणार नाही, रंग गुलाल उधळणार नाही. संबंधीत विभागातुन पुर्व परवानगीशिवाय कोणतेही राजकीय कार्यक्रम करुन नयेत. व्हॉटसॲप ग्रुपचे ॲडमीन यांनी दि. १५/१०/२०२४ ते दि.२५/११/२०२४ या कालावधीमध्ये त्यांच्या ग्रुपच्या सेटींगमध्ये **"Only Admin"** करुन बदल करुन घ्यावा, जेणेकरुन ग्रुपमधील कोणताही सदस्य वादग्रस्त पोस्ट ग्रुपवर टाकणार नाहीत. जर ॲडमीन यांनी सेटिंगमध्ये बदल केला नाही व कोणी सदस्यांनी वादग्रस्त पोस्ट टाकल्याने काही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास पोस्ट करणा-या सदस्याला व ॲडमीनला जबाबदार धरुन योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल यांची कृपया नोंद घ्यावी.

**----0000----**